ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळ
द्वारा संचालित
# डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर

डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम चंद्रपूर येथे क्रीडा महोत्सव संपन्न
चंद्रपूर (का.प्र.) :
स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथे दिनांक 04 जानेवारी 2024 रोजी क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. संस्थेच्या कोषाध्यक्षा प्रा. अनुश्री पाराशर यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे यांनी महोत्सवाचे उद्‌घाटन केले.
याप्रसंगी महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. उद्‌घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे म्हणाले की, क्रीडा महोत्सवामुळे नवनवीन खेळांची माहिती होते. नवे खेळाडू विद्यार्थी पुढे येतात आणि जे विद्यार्थी आधीपासूनच खेळात असतात त्यांना एक नवीन संधी उपलब्ध होते त्यामुळे खेळ आणि विद्यार्थ्यांच्या विकासासह क्रीडा वातावरण निर्माण करण्यासाठी या क्रीडा महोत्सवाचे आयोजन आपण केलेले आहे. सदर क्रीडा महोत्सवात बॅडमिंटन, चेस, रस्साखेच, गोळाफेक, कबड्डी, खो-खो इत्यादी स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. बी.ए. भाग 1 व बी.कॉम. भाग 1 मध्ये कबड्डीचा सामना अत्यंत चुरशीचा झाला.
उद्‌घाटन सोहळ्याचे संचालन क्रीडा विभाग प्रमुख श्री. आशिष चहारे यांनी केले तर प्रास्ताविक डॉ. प्रवीण तेलखेडे यांनी केले. क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यासाठी संस्थेचे सचिव डॉ. एस. बी. कपुर सर यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.






स्व. मातादेवी नंदकिशोर



